# PROFIT ADVERTISERS (INDIA) Pvt. Ltd.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | PRESS CLIPPING | | | | |
| Client | Agrovision (2nd Day) | | | | |
| Publication | Punyanagari | | | | |
| Language | Marathi | Place | Nagpur | Date | 13/11/16 |

# संत्र्याच्या इतर जातींबाबतही विचार करा


## ▪ ॲग्रोव्हिजन कार्यशाळेत तज्ज्ञांचे आवाहन

**पुण्य नगरी** / प्रतिनिधी

नागपूर : लिंबूवर्गीय फळांच्या उत्पादनात संत्र्याचे पीक सर्वाधिक घेतले जाते. गेल्या काही वर्षांपासून संत्रा उत्पादनामधील अनियमिततेमुळे शेतकऱ्यांना तोटा सहन करावा लागत आहे.

आजघडीला देशात संत्र्यांच्या विविध जाती उपलब्ध असल्याने संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनी या जातींच्या लागवडीबाबतसुद्धा विचार करावा, असे आवाहन शेती तज्ज्ञांनी केले. रेशीमबाग मैदानात आयोजित ॲग्रोव्हिजनमध्ये 'संत्रा उत्पादन आणि प्रक्रिया' या विषयावरील कार्यशाळेला भारतीय कृषक समाजचे तज्ज्ञ अजय जाखर, लिंबूवर्गीय अनुसंधान केंद्राचे संचालक डॉ. लदानिया यांनी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

आपल्या देशातील शेतकरी उत्पादन घेताना शेजरील शेतकऱ्याचे जास्त अनुकरण करतो. त्यामुळे तो शेतकरी जे पीक घेतो, आपणसुद्धा तेच पीक घ्यावे, असा विचार करतो. यामुळे पिकांना नुकसान झाल्यास सर्वांनाच होते. मागील वर्षी काही ठिकाणी संत्र्याचे उत्पादन अधिक झाल्याने शेतकऱ्यांना संत्री कवडीमोल भावाने विकावी लागली. परंतु त्यांनी संत्र्याच्या इतर जातीची लागवड केली असती तर उत्पादनाचे वर्गीकरण होऊन अधिक शेतकऱ्यांना याचा फायदा झाला असता, असे मत डॉ. लदानिया यांनी व्यक्त केले.



## दुकानदारांऐवजी तज्ज्ञांचा सल्ला घ्या

शेतामध्ये पीकलागवडीपासून ते त्यावर फवारण्यात येणाऱ्या औषधांच्या वापराबद्दल शेतकरी बियाणे विक्रेत्यांचा सल्ला घेतात. त्यामुळे अनेकदा तज्ज्ञांनी दिलेल्या सल्ल्याप्रमाणे लागवड न करता दुकानदाराचा सल्ला अंमलात आणतात. परंतु यामुळे अनेकदा नुकसानीचा सामना करावा लागतो. शेतीतज्ज्ञांचा सल्ला विविध माध्यमातून उपलब्ध आहे. शेतकऱ्यांनी तो अंमलात आणण्याची गरज असल्याचे मत भारतीय कृषक समाजचे तज्ज्ञ अजय जाखर यांनी या वेळी व्यक्त केले.